


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Title Code- MAHMAR-51647
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७४१. वा    बुधवार    दि. १७ एप्रिल २०२४    पृष्ठ ८    किंमत ३रुपये




# जिल्हा सामान्य रुग्णालयातील विविध खरेदीतील अनियमिततेची चौकशी


## राज्याचे अवर सचिवांकडून पाच सदस्य समिती गठीत...

**पोस्टमार्टम ७१**

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय बुलढाणा व त्यांचे अधिनस्त असलेल्या कार्यालया मधील विविध उपकरणे, व साहित्य खरेदी प्रक्रियेतील आर्थिक अनियमित्ता केल्याचे सविस्तर तक्रार चंद्रकांत खरात सामाजिक कार्यकर्ते यांनी केलेल्या तक्रारी नंतर निष्पन्न झाल्याने विशेष लेखापरीक्षणा करण्यात आले होते गंभीर मुद्द्यांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव चंद्रकांत वडे यांनी नुकतेच एका पत्राद्वारे चौकशीचे आदेश दिले आहे. दरम्यान विविध विभागातील पाच प्रमुख अधिकारी यांची समिती गठित करण्यात आली आहे, सदर समिती जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा मध्ये तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ.पेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस यांच्या काळात खरेदीतील अनियमितता संदर्भात चौकशी करून शासनाकडे ३० दिवसात अहवाल सादर करण्याचे कडक आदेश अवर सचिव यांनी दिले आहे.

महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत खरात यांनी बुलढाणा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्फत त्यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात विविध उपकरणे व साहित्य खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमित्ता झाल्याबद्दल तक्रार नोंदविली होती. सदर तक्रारींच्या अनुषंगाने खरात व सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा या कार्यालयाचे लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त अधिनियम १९७३ चे कलम (१२) ३ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत चौकशी ही विशेष तपास समितीकडून करण्याचे निर्देश पोलीस महासंचालक मुंबई यांना देण्यात यावे अशी आग्रही मागणीही तक्रारकर्त्यांनी लोक आयुक्त प्रशासन भवन मंत्रालय मुंबई यांच्याकडे १२ जानेवरी २०२४ रोजी एका पत्राद्वारे केली होती. सदर तक्रारीनंतर उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ यांनी २९ फेब्रुवारी २०२४ रोजी एका पत्राद्वारे बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा यांच्याकडून परिपूर्ण परिच्छेद अनुपालन दिलेले नसल्यामुळे संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्या बाबतचे आदेश जारी केले होते. नुकतेच महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे अवर सचिव चंद्रकांत वडे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे रुग्णालयातील बांधकामे,उपकरणे व इतर साहित्य खरेदीत झालेल्या अनियमितते बाबत चौकशी करण्यासाठी पाच सदस्य समिती गठित केली. यामध्ये शहरी आरोग्य उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई चे डॉ संजीवकुमार जाधव यांची समिती अध्यक्ष म्हणुन नियुक्ती केली. तर इतर सदस्यांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर चे कार्यकारी अभियंता, उपसंचालक आरोग्य सेवा अकोला चे अभियंता, प्रशासकीय अधिकारी जिल्हा सामान्य रुग्णालय पालघरचे भाऊ सिन्नलकर,व नितीन काकडे लेखाधिकारी व भांडार पडताळणी अधिकारी कुटुंब कल्याण पुणे यांचा सदर चौकशी समितीत मध्ये समावेश आहे. राज्याचे अवर सचिव यांनी दिलेल्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या पाच सदस्य समितीला सदर प्रकरणात सखोल चौकशी करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसाच्या आत शासनास तसेच आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांना सादर करावयाचे आहे.याबरोबरच आयुक्त आरोग्यसेवा आयुक्तालयाने चौकशी समितीच्या चौकशी अहवालाच्या आधारे सदरहू गंभीर आर्थिक अनियमितेस जबाबदार असलेल्या तत्कालीन संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय बुलढाणा व मुख्य प्रशासकीय अधिकारी तसेच इतर




कर्मचाऱ्यांविरुद्ध तात्काळ महाराष्ट्र नागरी सेवा १९७१ मधील नियम १२ नुसार विभागीय चौकशीचा प्रस्ताव पुढील १५ दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहे. सामाजिक कार्यकर्ते खरात सिटी न्यूज यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा मध्ये बांधकाम , तांत्रिक उपकरणे व इतर साहित्य खरेदी प्रकरणात झालेल्या करोडो रुपये गैरव्यवहाराबद्दल सातत्यपूर्ण प्रभावी मुद्देसूद तक्रारी व पाठपुरावा केल्याची राज्य शासनाच्या अवर सचिवाने गांभीर्याने दखल घेतली आहे. शासनाने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानंतर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक व मुख्य प्रशासकिय अधिकारी तसेच ईतर कर्मचाऱ्यावर होणाऱ्या कारवाईकडे महाराष्ट्रासह संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

## आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या पाच जुगाऱ्यांना एलसीबीने पकडले १ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, तीन ठिकाणी केली कारवाई

**जनसंचलन/बुलढाणा**

आयपीयल सट्यावर लावणाऱ्या पाच जुगाऱ्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १४ एप्रिल रोजी हिवरा खुर्द, देऊळगाव मही आणि अमडापूर येथे छापा टाकून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाइलसह अन्य साहित्य असा १ लाख ४४ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन सतर्क असून कायदा व सुव्यवस्थेला प्रथम आहे. त्यानुषंगाने खेळणाऱ्यांचा शोध करण्यासाठी प्राधान्य दिले जात आयपीएलवर सट्टा घेऊन कारवाई एका पथकाचीही स्थापना केली आहे. त्यानुषंगाने या स्वतंत्र पथकास मिळालेल्या माहितीच्या आधारावर ही कारवाई करण्यात आली. अमडापूर येथील कारवाईत शेख फहीम शेख सलीम (४०) यास नगदी ८ हजार ५० रुपये, एक मोबाइलसह ताब्यात घेण्यात आले. जानेफळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत हिवरा खुर्द येथे शेख इमरान शेख अक्तर (२९, रा. मोळा), आसीफ खान शफीर खान (३३, रा. जानेफळ), रोहित रामदास शिंदे (२४, रा. जानेफळ) आणि देऊळगाव मही येथे सय्यद सईद सय्यद हबीब (रा. देऊळगाव मही) यांना ताब्यात घेण्यात आले. हिवरा खुर्द येथील कारवाईत २७ हजार २४० रुपयांचे साहित्य आणि देऊळगाव मही येथे ९४ हजार रुपयांचे साहित्य ताब्यात घेण्यात आले. या तिन्ही कारवायांमध्ये १ लाख ४४ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. पाचही आरोपींविरोधात संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक आशिष चेचरे, पीएसआय सचिन कानडे आणि रवी मोरे करीत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे, सहायक



पोलिस निरीक्षक आशिष चेचरे, पोलिस उपनिरीक्षक सचिन कानडे, रवी मोरे, सहायक फौजदार गजानन माळी, पोलिस हेडकॉन्स्टेबल दिनेश बकाले, जयंत बोचे, दीपक वायाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे

# आम्हाला हवा देवाभाऊच फडणवीसांच्या प्रचारसभा व्हाव्यात यासाठी उमेदवारांची जोरदार मागणी!...

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. एकीकडे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीची महायुती तर दुसऱ्या बाजूला शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी शरद पवार आणि काँग्रेसची महाविकास आघाडी जोरदार कामाला लागलीये. प्रचारसभांना उधाण येताना दिसून येतंय. याक्रमात देशभरासह महाराष्ट्रातही नरेंद्र मोदींच्या सभांना सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात मात्र महायुतीच्या एका नेत्याच्या सभांची प्रचंड क्रेझ असलेली दिसून येतेय. आपण बोलतोय महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल. देवेंद्र फडणवीसांची सभा म्हणजे विजयाची गॅरंटी असं वातवरण महायुतीचे उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी महायुतीतुन निवडणुकांना सामोरे जात आहेत. निवडणूक प्रचारात शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या उमेदवारांचीही देवेंद्र फडणवीसांची आपल्या मतदारसंघात सभा व्हाव्यात अशा इच्छा दिसून येतायेत. नरेंद्र मोदी आणि अमित शहांच्या प्रचारसभांना जितकी मागणी आहे, तितकीच मागणी देवेंद्र फडणवीसांच्या सभांना आहे. या सगळ्यात फडणवीसांचं महाराष्ट्रातल्या राजकारणातलं आणि महायुतीतल्या स्थानाबद्दल अंदाज लावता येऊ शकतो. लोकसभा निवडणुक नेहमीच केंद्रीय मुद्यांभोवती फिरते. देशातले भ्रष्टाचार, गरिबी, महागाई यासारखे अनेक इतर मुद्दे निवडणुकीच्या केंद्रस्थानी असतात. त्यामुळे देशातल्या लोकसभा निवडणूक प्राचारात या सर्व गोष्टींचा बारकाईने अभ्यास असलेल्या केंद्रीय नेत्यांची सभा आपल्या मतदारसंघात व्हावी असा आग्रह उमेदवारांचा असतो. महायुतीचा विचार केला तर नरेंद्र मोदी आणि अमित शहांच्या सभांची अपेक्षाही याच कारणांमुळे महायुतीच्या उमेदवारांना असते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर भाजप निवडणुकांना सामोरं जाणार आहे. आपल्या मतदारसंघात पंतप्रधानांची सभा झाली तर त्या करिष्म्यात विजयी होण्याचे मार्ग अजून सुकर होतील ही बाजूही असतेच. परंतु त्याच धर्तीवर आता देवेंद्र फडणवीसांच्या सभांनाही आग्रह असल्याचं पाहायला मिळतंय. देवेंद्र फडणवीसांकडे राजकरणापलीकडे जाऊन नेहमीच अभ्यासू नेतृत्व म्हणून पाहिलं गेलंय, त्यामुळे प्रत्येक लोकसभा मतदारसंघातील सर्वच वर्गांमध्ये फडणवीसांबद्दलची सरकारात्मक भावना तयार झाली आहे. त्याचं मतात रुपांतर करण्यासाठी फडणवीसांच्या सभा महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांचा मतदारांवर परिणाम होईल अशी खात्रीच महायुतीतील नेते आणि कार्यकर्त्यांना आहे असं दिसून येतंय. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या सभांची वाढती मागणी त्यांची लोकप्रियता अधोरेखित करते. पुर्व विदर्भात, लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्याचं मतदान १९ एप्रिलला आहे. १५ एप्रिलपर्यंत फडणवीसांनी १६ सभा घेतल्या. प्रचाराला अजून दोन दिवसांचा वेळ आहे. यात सभांची भर पडू शकते. त्यामुळे फडणवीसांच्या सभांचा एकुण स्ट्राईकरेट इतर कोणत्याही नेत्यापेक्षा जास्तीचा आहे हे स्पष्ट आहे. म्हणजेच फडणवीसांनी प्रत्येक टप्प्यात २० सभा घेतल्या तरी त्यांच्या सभा हा १०० चा आकडा आरामात गाठू शकतात. कार्यकर्त्यांना मात्र १२५ ते १३० सभा फडणवीसांकडून अपेक्षित आहेत. फडणवीससुद्धा या दिशेनं प्रयत्न करत असल्याचं पहायला मिळतंय. शिवाय महाराष्ट्रासोबतच देशातील इतर राज्यातही फडणवीसांच्या सभांचा आग्रह असलेला पाहायला मिळतोय. फडणवीसांच्या वाढत्या सभा त्यांची मतदारांमधील वाढती स्वीकृती अधोरेखित करत असल्याचं कार्यकर्ते म्हणतायेत. महाविकास आघाडीच्या सभांनाही सुरुवात झाली आहे. परंतु फडणवीसांच्या जोरदार आणि मोठ्या संख्येने होणाऱ्या सभांची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. महायुतीतील अनेक उमेदवार नाराज असल्याच्या चर्चाही आहेत, या उमेदवारांची नाराजी दूर करण्याचं कामही फडणवीस करताना दिसतायेत. दिवसभर सभा आणि रात्री बैठका असा धडाकाच देवेंद्र फडणवीसांनी लावल्याने, फडणवीसांच्या सभा सर्वत्र चर्चेचा विषय झाला आहे.

# अखिल भारतीय मराठा महासंघ क्रिडा विभाग तर्फे सामान्य ज्ञान स्पर्धा व रंग भरो स्पर्धा संपन्न




**जनसंचलन/ खामगांव**

अखिल भारतीय मराठा महासंघ क्रीडा शैक्षणिक व सांस्कृतिक विभाग खामगाव द्वारा आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त महापुरुषांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा व रंग भरो स्पर्धा आज दिं १४-४-२०२४ रविवार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ती स्थानिक श्री छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे संध्याकाळी ५ वा आयोजित करण्यात आली होती सर्व प्रथम राजमाता माँ जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या ला माल्याअर्पण करून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहु महाराज,क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले,यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले नंतर सामान्य ज्ञान स्पर्धा, व रंग भरो स्पर्धे ला सुरुवात करण्यात आली सामान्य ज्ञान स्पर्धेत एकूण ७१ विद्यार्थी सहभागी झाले तसेच रंग भरो स्पर्धा अ गट मध्ये एकुण ३३ विद्यार्थी व ब गट मध्ये एकुण १०२ विद्यार्थी सहभागी झाले होते या स्पर्धेचे बक्षीस वितरण दिं १७-४-२०२४ बुधवार रोजी संध्याकाळी श्री छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम वर होईल या प्रसंगी माजी नगराध्यक्ष गणेशभाऊ माने, अ भा मराठा महासंघ क्रिडा सांस्कृतिक, शैक्षणिक जिल्हा अध्यक्ष विकास भाऊ चव्हाण, रमाकांत गलांडे, सुभाष शेळके, भिकाजी रेडेकर, संजय नळकांडे, देविदास शर्मा, सुनील मोटे, नागोराव अवतार, आकाश खरपाडे, दिपक बागडे, कचरू रेठेकर, महेंद्र जेवे,ॲड विशाल भवर, विशाल रेठेकर, गोविंद पवार, निखिल घाडगे, संकेत बागडे, गौरव गजलकर,श्रीकांत कापले, शंतनू चव्हाण, विजय बंड, समर्थ शिंदे, गजानन मुळीक, अनिल मापारी,सौ मोनिका काटकर, सौ मीनाताई मापारी, साक्षी मापारी व सहभागी विद्यार्थी यांचे पालक, परीसरातील महीला, पुरूषांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# मानस फाउंडेशन बुलढाणा यांच्या वतीने विधवा पुनर्विवाह संपन्न...



**जनसंचलन/बुलढाणा**

आनंदी परिवार व मानस फाउंडेशन बुलढाणा यांच्या वतीने प्रा. अण्णासाहेब भळसणे सुंदरखेड बुलढाणा येथे विधवा पुनर्विवाह संपन्न झाला यावेळी वर कैलास अशोक कराळे राहणार बुलढाणा यांचा वधू सुनीता नारायण तायडे यांच्यासोबत पुनर्विवाह संपन्न झाला. विधवा घटस्फोटीत महिलांच्या पुनर्विवाहाची चळवळ सुरू झाल्यानंतर हे २२ वे लग्न आहे यावेळी मानस फाउंडेशनचे डीएस लहाने अण्णासाहेब म्हल्सने. गौरव देशमुख. गजान मुळे.संदीप जाधव. ज्ञानेश्वर उबरहंडे. उपस्थित होते




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जात प्रमाणपत्र पडताळणीतर्फे समता पंधरवडा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे समता पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १२ ते २९ एप्रिल या कालावधीत समता पंधरवडा राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. समता पंधरवड्यात अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेतील २०२३-२०२४ मधील सर्व प्रवेशित मागास-वर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान विज्ञान शाख-ेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे तालुका आणि महाविद्यालयनिहाय संख्यात्मक माहिती समानसंधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय, तसेच जिल्हास्तरावर संकलित करण्यात येणार आहेत. समता पंधरवड्यात सीईटी देणारे विद्यार्थी, डिप्लोमाच्या तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज देखील भरण्यात येऊन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयातील समान संधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन करण्यात येणार आहे. समान संधी केंद्राच्या माध्यमातून सर्व मागास-वर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करण्यात येणार असून प्राप्त अर्जावर तत्काळ कार्यवाही करुन वैधता प्रमाणपत्र देण्याचे नियोजन जात पडताळणी समितीच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे, तसेच मोहिमेचा लाभ घ्यावा. असे आवाहन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव मनोज मेरत यांनी केले आहे.

# लोकसभा निवडणूक कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा निवडणूक २०२४ची घो-षणा झाली असून दि. १६ मार्च पासून आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी यांना प्राप्त अधिकारानुसार जिल्ह्यात मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) लागू करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी, तसेच मतदारसंघाचे मतदार नसतील अशा व्यक्तींनी कोणत्याही प्रकारच्या राजकीय सभा घेऊ नये. जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहणे आवश्यक असल्याने दि. २६ एप्रिल २०२४ रोजी बुलढाणा लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. कायदा व सुव्यवस्था कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच लोकसभा निवडणूक निर्भय व नि:पक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय नेते आणि कार्यकर्ते या मतदारसंघाचे मतदार नसतील, अशा व्यक्तींनी मतदानाचा दिनांक आणि मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजे दि. २४ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेनंतर कोणत्याही प्रकारच्या राजकीय सभा घेऊ नये. तसेच मतदानाचा निश्चित केलेल्या दिनाकाच्या ४८ तासाच्या अगोदर सदर मतदारसंघ सोडून जाण्याचे आदेश करण्यात आले आहे. सदर बंदी आदेश संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याकरीता मलकापूर विधानसभा मतदारसंघ वगळून दि. २४ एप्रिल २०२४ रोजीचे सकाळी ६ वाजेप-ासून ते दि. २६ एप्रिल २०२४ च्या रात्री २२.०० वाजेपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ व भारतीय दंड संहिता, १८६०चे कलम १८८ नुसार कार्यवाहीस पात्र राहणार आहे.

# निवडणूक निरीक्षक सिंदखेड राजा मतदार संघाच्या दौऱ्यावर मतदान केंद्रांवर दिल्या भेटी...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक सामान्य निरीक्षक मा. श्री. पी. जे. भागदेव हे सध्या बुलढाणा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाला भेट देऊन त्यांनी मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्यासमवेत बुलढाणा लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने विविध मतदान केंद्रांना भेटी दिल्या. निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व स्तरावरील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे, मतदान यंत्रे सुरक्षा कक्षामध्ये सुरक्षित आहेत तसेच च्या सुरक्षितेविषयी खातरजमा श्री. भागदेव यांच्याकडून करण्यात आली. श्री. भागदेव यांनी देऊळगाव राजा तालुक्यातील शिवाजी हायस्कूल देऊळगाव राजा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देऊळगाव मही, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकरखेड भागिले या मतदान केंद्रांना आज भेटी देऊन तेथ-ील व्यवस्थेची पाहणी करून घेतली.



निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची संख्या सद्यस्थितीमध्ये पुरेशी आहे, आंतर जिल्ह्याच्या ठिकाणी चेक पोस्ट सक्रिय आहे इत्यादी विषयाचा आढावा घेण्यात आला. आजच्या आढावा दौऱ्यामध्ये मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ , मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा अस्मा मुजावर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. महल्ले,नोडल अधिकारी श्री. मतकर, अव्वल कारकून देऊळगाव राजा श्री. प्रशांत वाघ इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

# श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या पाठिंब्याने राजपूत समाज एकवटला ८० टक्के समाज संदीप शेळकेंच्या पाठीशी- आनंदसिंग ठोके

जनसंचलन/बुलढाणा



वन बुलढाणा मिशनचे संकल्पक तथा बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांना विविध संघटनेचा, समाजातील विविध घटकांचा पाठिंबा मिळत आहे. आता श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेने शेळकेंना पाठिंबा जाहीर केल्याने जिल्ह्यातील राजपूत समाज एकवटला आहे. करणी सेनेचे राष्ट्रीय महासचिव आनंद सिंग ठोके, प्रदेशाध्यक्ष जीवनसिंग सोळंकी यांनी जाहीरपणे संदीप शेळके यांना पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. यामुळे आधीच विकासाचे व्हिजन असल्याने लोकप्रिय ठरलेल्या संदीप शेळके यांची ताकद वाढली आहे. राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे राष्ट्रीय महासचिव आनंद सिंग ठोके आणि महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष जी-वनसिंग सोळंकी यांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून ही माहिती दिली. ते म्हणाले की, आमचा ८० टक्के समाज शेळकेंच्या पाठीशी आहे. बुलढाण्यात आमचे संघटन मोठ्या प्रमाणात आहे. शेळके विकासाचे व्हिजन घेऊन प्रामाणिकपणे काम करत आहेत. विकसित बुलढाणा जिल्ह्याचे नाविन्यपूर्ण संकल्पना त्यांनी तयार केली आहे. सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी , शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना कार्यान्वित करून त्यांचे कल्याण करण्यासाठी तसेच सर्वसामान्यांच्या विकासासाठी ते कटिबद्ध आहेत. संदीप शेळके यांच्यासारखे सुशिक्षित खासदार जिल्ह्याला गरजेचे आ-हेत. जिल्हाभरातून त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत असून आम्ही श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या वतीने झ्ङ्खजाहीर पाठिंबा देत आ-होत पुढच्या दोन ते तीन दिवसात बुलढाण्यात येऊन करणी सेनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी संदीप शे-ळके यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# लाच प्रकरणातील दोन आरोपींना २९ एप्रिल पर्यंत न्यायालयीन कोठडी

जनसंचलन/ सिंदखेडराजा

येथील रेती लाच प्रकरणातील दोन आर-ोपींना दि. २९ एप्रिल पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. रेती व्यावसायिकाकडून ३५ हजारांची लाच घेण्याच्या प्रकरणात आरोपी तालुका दंडाधिकारी व तहसीलदार सचिन शंकरलाल जैस्वाल, वय ४३ वर्षे, वाहन चालक मंगेश शालिग्राम कुलथे, वय ४० व शिपाई पंजाब तेजराव ताठे, वय ५५ यांना दि. १२ एप्रिल, शुक्रवारी दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले होते. रात्री उशीरापर्यंत चौकशी, झाडाझडती घेऊन त्यांना अटक करण्यात आली होती. यातील आर-ोपी शिपाई पंजाब ताठे यास सूचनापत्र देत सोडून देण्यात आलेले आहे. तर तहसीलदार सचिन जैस्वाल व वाहन चालक मंगेश कुलथे यांना आज दि. १५ एप्रिल, सोमवार पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. आज दि. १५ एप्रिल, सोमवारी त्यांना पुन्हा मेहकर न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना दि. २९ एप्रिल, सोमवारपर्यंत




न्यायालयीन कोठडी सुनावली आहे, अशी माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी दिली आहे.

# माझा स्वातंत्र्य सेनानींचा रक्त, अशा मी धमक्यांना भीक घालत नाही...

## बुलढाणा वन मिशनच्या संदीप शेळके कडून माजी मंत्री आ. संजय कुटेंना आपल्या शैलीत प्रतिउत्तर..




**जनसंचलन/बुलढाणा**

निवडणुकीच्या काळात दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळे संदीप शेळके निवडणूक आयोगाकडे खासदार प्रतापराव जाधव व आमदार संजय कुटेंवर कारवाईसाठी करणार तक्रार दाखल माझे आजोबा स्वातंत्र्य सेनानी उत्तमराव पाटील हे गांधीजींसोबत १९४२ च्या लढ्यामध्ये होते, चलेजावच्या चळवळीत होते, नानासाहेब पाटलाच्या प्रतिसरकार मध्ये होते. मी उत्तमराव पाटलाचा नातू आहे हे उत्तमराव पाटलाचा रक्त आहे. त्यामुळे अशी राजकीय पोकळ दादागिरीला मी भीक घालत नाही. अशा खमक्या शब्दात भाजपचे आमदार संजय कुटे यांना वन मिशनचे उमेदवार युवानेते संदीप शेळकेनी दिलाय यावेळी त्यांनी संजय कुटे यांनी दिलेल्या पोकळ धमकी वजा इशाऱ्याचा निषेध देखील केलाय. आ. कुटेंनी भर सभेतून संदीप शेळकेंना निवडणूकीनंतर त्यांच्या बँकेची चौकशी करणार असल्याचे सांगितले होते. खासदारांची देखील पतसंस्था आहे ते देखील पतसंस्थेमधील निवडणूकिसाठी पैसा वापरतात का? असा प्रश्न देखील संदीप शेळकेंनी उपस्थित करून खा.प्रतापराव जाधव यांच्या चिथावणी वरून आ.कुटे यांनी हे वक्तव्य केले असल्याचा आरोप देखील संदीप शेळके यांनी केले आहे.आ. कुटे आणि खासदार हे दोन्ही निष्क्रिय लोक आहे.यांनी ठेकेदारी शिवाय जिल्ह्यात काहीच केले नाही.मी विकासाची भूमिका घेवून जाताना, व्हिजन मांडताना त्यांचा हा त्यांचा नाकर्तेपणा असून मी राजकीय दादागिरी मोडीत काढण्यासाठी मी सातत्याने बोलतो आहे.प्रयत्न करतो आहे.म्हणून माझ्यावर हे लोक दबाव आणताय. म्हणून मी निवडणूक आयोगाकडे आ.कुटे व खा.जाधवांवर कारवाई करण्यासाठी तक्रार दाखल करणार आहे.असे संदीप शेळकेंनी पत्रकारांना सांगितले

# ऐन मतदानाच्या तोंडावर उद्धव ठाकरे गटाला खिंडार...

## जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्ते शिंदेंच्या शिवसेनेत...

## जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवतांवर घणाघाती आरोप

**जनसंचलन/बुलढाणा**




सध्या राज्यातच नव्हे तर संपुर्ण देशात लोकसभेचे वातावरण तापलेले आहे. रोज नवीन नवीन घडामोडी समोर बघायाल मिळत आहे.त्यामुळे या वर्षीची लोकसभा आगळीवेगळी होण्याची दिसून येत आहे. बुलढाणा लोकसभा मतदार संघात सुध्दा वेगळै वातावरण निर्माण झालेले आहे.ठाकरे गटाला मोठा धक्क लोकसभेच्या अगोदच बसलेले आहे.बुलढाणा लोकसभेची निवडणूक दोन्ही शिवसेनेसाठी अतिशय प्रतिष्ठेची असताना मतदानाला दहा दिवस शिल्लक असतांनाच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठे भगदाड पडले आहे. उद्धव ठाकरे गटाचे वाहतूक सेनेचे जिल्हा प्रमुख शरद हाडे, यांच्या सह सात पदाधिकारी आणि सातशे ते आठशे कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केलाय. तर उद्धव ठाकरे यांच्याकडे सक्षम पर्याय असताना देखील त्यांनी नरेंद्र खेडेकर यांना उमेदवारी दिली, आपण जिल्हा परिषद निवडणुकीत दोन हजार मतांनी खेडेकर यांचा पराभव केला होता, जे जिल्हा परिषद निवडून येऊ शकतं नाहीत त्यांना उमेदवारी दिल्याने जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवतांनी मॅच फिक्सिंग केल्याचा घणाघाती आरोप देखील शरद हाडे यांनी केला आहे..

# मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**जनसंचलन/बुलढाणा**



संत गाडगे बाबा विद्यापिठ अमरावती संचालित मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.अण्णा साहेब म्हळसने कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. व आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रस्तावना व सूत्रसंचालन प्रा.बलवान विनकर यांनी केले.यावेळी प्रा.शीला दाभाडे/रोकडे यांनी आपले विचार व्यक्त करतांना त्या म्हणाल्या की, असे म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठिमागे एका स्त्रीचा हात असतो,परंतू स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगती मागे फक्त एकच महापूरुषाचा हात आहे,आणि तो म्हणजे बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर.... त्यांचा विरोध हा विषमतेला,अन्यायाला होता.कोणत्याही एका जाती-धर्माला नव्हता,म्हणूनच बाबासाहेब सर्व जाती-धर्मातील विषता नष्ट करुन समानता प्रस्थापित करणारे महान नेते होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनिष्ठरुढी,परमपरा व त्यातून येणारी हे सर्व घटक बाबासाहेबांनी अभ्यासले. आज स्वातंत्र्य भारतात कित्येक अधिकार महिलांना मिळाले आहेत. स्त्रियांच्या अधिकार व हक्कासाठी व गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी कार्य केलेले आहे.हिंदू कोड बील मध्ये तरतुदी केल्या आहेत.व सरकारने टप्याटप्याने मान्य केल्या आहेत. दिवसाचे १२ तास चे काम ८ तासावर आणले आहे.महिलांना डिलिव्हरी सूटट्या संविधानात नमुद केल्या आहेत. पुरुषाप्रमाणे समान काम समान वेतन.चूल आणि मूल,सतिप्रथा या प्रथा बंद केल्या. अश्या महामानवाला माझा कोटी,कोटी प्रणाम.तसेच प्रा.डॉ.दिपककुमार देशमुख,प्रा.डॉ.मुरलिधर जाधव व डॉ.डांगे यानी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाला सर्व प्राध्यापकवृद व कार्यालयीन कर्मचारी रुपाली गुडधे व मंगेश जोशी उपस्थीत होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958